**प्रेस नोट** **दि.२०/०३/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन**

**सापडलेल्या ६ वर्षांचे मुलाचे आई वडीलांचा शोध घेऊन, मुलास त्यांचे ताब्यात दिले.**

दिनांक १७/०३/२०१९ रोजी दुपारी १४:३० वा.चे सुमारास नागरिकांना बेवारस सापडलेल्या मुलास त्यांनी येरवडा पोलीस स्टेशन अंकीत लक्ष्मीनगर पोलीस चौकीचे ड्युटी अंमलदार पो.हवा. ४४५९ धनंजय गोंगे यांच्या ताब्यात दिले. सदर मुलास त्याचे नाव फक्त कृष्णा परमार एवढेच सांगता येत होते. त्यास त्याचा पत्ता सांगता येत नव्हता. त्यामुळे पो.हवा. ४४५९ गोंगे यांनी त्यांचे मदतीचे कर्मचारी पो.ना. ६८३५ रमेश मेमाणे व लक्ष्मीनगर बीट मार्शलचे कर्मचारी पो.शि. ७४३६ अंकुश निकम व पो.शि. ७४०१ नवनाथ ताम्हाणे यांचे मदतीने सदर मुलाचे आई, वडील, नातेवाईकांचा लक्ष्मीनगर, पर्णकुटी भागात कसोशीने शोध घेतला असता, रात्रौ २०:०० वा.चे सुमारास सदर मुलाचे वडील श्री.शामवीर गोपालसिंग परमार, वय ३५ वर्षे, रा. संगमवाडी, पुणे यांचा शोध लागल्याने, वरील नमूद पोलीस कर्मचारी यांनी सदर मुलास त्याचे आई वडीलांचे ताब्यात सुखरूप परत दिले. त्याबाबत मुलाचे आई वडीलांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील पो.हवा. ४४५९ धनंजय गोंगे, पो.ना. ६८३५ रमेश मेमाणे, पो.शि. ७४३६ अंकुश निकम व पो.शि. ७४०१ नवनाथ ताम्हाणे यांनी नागरिकांना बेवारस स्थितीत मिळून आलेल्या ६ वर्षांचे लहान मुलाचे आई वडीलांचा काही तासात शोध घेऊन, सदर मुलास त्याचे आई वडीलांचे ताब्यात देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



